ePaper

# झारखंडचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आता महाराष्ट्राचे राज्यपाल




| वर्ष - 8 | अंक - 23 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 28 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- जो रुटने केला मोठा पराक्रम
- यशस्वीने ११ महिन्यांत करुन दाखवलं
- दीपिकासह केले इंटिमेट सीन
- ममताचा मोदी सरकारवर आरोप


## काँग्रेसला पडलाय प्रश्न

# पुण्याचे पालकमंत्री दादा की अण्णा?

## पूरग्रस्त पुणेकर नागरिकांना वेठीस धरण्याचे काम

। पुणे । महाईन्यूज

**गेल्या दोन दिवसात पडलेल्या पावसामुळे शहरात नागरी सुविधांचा बट्ट्याबोळ उडाला. चार जण दगावले. अनेक मध्यमवर्गीयांच्या मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले. या सर्व परिस्थितीला गेले सात वर्ष चाललेला जबाबदाभाजपचा भ्रष्ट आणि नियोजनशून्य कारभार आहे, असा आरोप काँग्रेसकडून करण्यात येत आहे.**



### अजितदादा की मोहोळ?

या पूरस्थितीला सामोरे जाताना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि पालकमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांच्या बैठका स्वतंत्रपणे घेतल्या. बिकट प्रसंगातही दोन मंत्र्यांमध्ये समन्वय नसल्याचेच अशा बैठकांमधून दिसून आले. आपापल्या पक्षाला श्रेय घेण्यासाठी केले. त्यामुळे पुणेकरांपुढे प्रश्न निर्माण झाला की, पालकमंत्री कोण?

अजितदादा की मोहोळ? खडकवासला धरणातून पाणी नदीत सोडले. त्याबाबत नागरिकांना पूर्वसूचना देण्यात आल्या नाहीत, अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत. याबाबतही दोन मंत्र्यांची विधाने विसंगत आहेत. पाणी नेमके किती? आणि किती वाजता सोडले? याची उत्तरे पुणेकरांना मिळालेली नाहीत, असे प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी यांनी पत्रकात म्हटले आहे. भारतीय जनता पक्षाने पुणेकरांना स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले. पण, सिटी स्मार्ट होणे राहू दे, ती बकालच झाली. 2017 पासून 5 वर्ष महापालिकेत सत्ता भाजपची होती. 2014 पासून 2019 पर्यंत आणि गेली दोन वर्षे राज्यात भाजपचे सरकार आहे. या सरकारांनी पुण्यासाठी ठोस मदत केली नाही. उलट महापालिकेच्या अनेक कामांमध्ये भ्रष्टाचार केल्याच्या तक्रारी आहेत. भाजपचे लोकप्रतिनिधी टेंडरमध्येच रमल्याचे सर्रास बोलले जात होते. भाजपचे खासदार, आमदार पुणेकरांनी निवडून दिले. परंतु, भाजपच्या लोकप्रतिनिधींनी निराशाच केली, असे मोहन जोशी यांनी पत्रकात म्हटले आहे.

### पुणेकरांची परवड झालीय...

मुळा-मुठा नदी सुधार योजनेचा गवगवा खूप केला. पण, त्या दृष्टीने काम तसूभरही झालेले नाही. शहरात साठणाऱ्या पाण्याचा निचरा होण्यासाठी सक्षम ड्रेनेज व्यवस्था नाही. नदीकाठी पूररेषा आखून नियोजन करण्याबाबतही ढिलाई दाखवलेली आहे. महापालिकेच्या दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा, अशी परवड पुणेकरांची झालेली आहे. पुणेकरांनी गेल्या 10 वर्षात प्रत्येक निवडणुकीत भाजपला कौल दिलेला आहे. त्या बदल्यात आपल्याला काय मिळाले? याचा विचार पुणेकरांनी करण्याची आता गरज आहे, असे मोहन जोशी यांनी म्हटले आहे.

## विधानसभेची तयारी जोरात, इच्छुकांची निवडणूक लढवण्याची तयारी सुरू

## हडपसर विधानसभा मतदारसंघामधील एकाच मतदारसंघामध्ये तीन प्रमुख पक्षांचे शहराध्यक्ष इच्छुक

। पुणे । महाईन्यूज
। विशेष प्रतिनिधी।



विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. महाविकास आघाडी आणि महायुतीकडून जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला नसला तरी इच्छुकांनी निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. काही इच्छुकांना पक्षाकडून काम सुरू करण्यासाठी सूचना मिळालेला आहेत तर काहींना उमेदवारीबाबत ग्रीन सिग्नल पक्षाकडून देण्यात आला आहे.

पुणे शहरांमध्ये आठ विधानसभा मतदारसंघ आहेत. या विधानसभा मतदारसंघ मधील हडपसर विधानसभा मतदारसंघांमध्ये तीन प्रमुख पक्षांचे शहराध्यक्ष इच्छुक असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी हडपसर विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली आहे. पक्षाकडून त्यांना उमेदवारी बाबत ग्रीन सिग्नल देखील मिळाल्याचे बोलले जात आहे.दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे शहराध्यक्ष प्रमोद नाना भानगिरे यांनी देखील आगामी विधानसभा निवडणूक लढवण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे.

शिवसेना शिंदे गटाला पुण्यातील किमान तीन जागा मिळाव्यात आणि त्यामध्ये हडपसरची जागा असावी असा आग्रह नाना भानगिरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे धरलाची चर्चा आहे. या दोन शहराध्यक्षां बरोबर आता मनसेचे शहराध्यक्ष साईनाथ बाबर देखील रेसमध्ये उतरले आहेत. साईनाथ बाबर यांनी आगामी विधानसभा निवडणूक आपण लढणार असल्याचं सोशल मीडियावर जाहीर केले आहे. त्या प्रकारची पोस्टर सध्या व्हायरल करण्यात येत आहेत. दरम्यान पुणे शहरातील मनसे पदाधिकाऱ्यांनी नुकतीच शिवतीर्थया राज ठाकरे यांच्या निवास त्यांनी जाऊन भेट घेतली. या भेटीदरम्यान पुणे शहरातील आठही मतदारसंघाचा अहवाल राज ठाकरे यांना देण्यात आला.

### राज ठाकरेंकडून बाबर यांना ग्रीन सिग्नल

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून राज ठाकरे यांनी आठ विधानसभा मतदारसंघाचा यावेळी आढावा देखील घेतला. तसेच सर्व विधानसभा मतदारसंघात कामाला लागा अशा सूचना देखील राज ठाकरे यांच्याकडून पदाधिकाऱ्यांना दिल्या आहे. राज ठाकरेंना भेट घेणाऱ्या नेत्यांमध्ये शहराध्यक्ष साईनाथ बाबर, किशोर शिंदे, बाबू वागस्कर हे मनसे नेते होते. या भेटीदरम्यानच साईनाथ बाबर यांना हडपसर विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवण्यास ग्रीन सिग्नल मिळाला असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे त्या दृष्टिकोनातून साईनाथ बाबर यांनी तशी तयारी सुरू केली आहे.

# पुराच्या दूषित पाण्यामुळे आता धोका!

## पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित झाले असण्याची शक्यता

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात अतिवृष्टीमुळे अनेक भागांत पूर आला होता. यामुळे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित झाले असण्याची शक्यता आहे. दूषित पिण्याच्या पाण्यातून जलजन्य आजारांचा प्रसार होण्याचा धोका अधिक असतो. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने नागरिकांना काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.**



पावसाच्या पाण्यामुळे पिण्याचे पाणी दूषित होते. हे पाणी पिल्यास अतिसार, थंडी, ताप यांसारखा त्रास होऊ शकतो. अशी लक्षणे दिसून आल्यास आशा सेविका, परिचारिका, आरोग्य सेवकांकडून त्वरित उपचार करून घ्यावेत. तसेच नजीकच्या महापालिकेच्या दवाखान्यात संपर्क साधावा. जुलाब आणि अतिसारात जलशुष्कतेसाठी ओआरएस तथा जलसंजीवनीचा (साखर, मीठ, पाणी) वापर करावा. जुलाब, अतिसार, काविळची साथ असल्यास पिण्याच्या पाण्यात क्लोरीन लिक्विड टाकूनच प्यावे, असे आरोग्य विभागाने म्हटले आहे.नागरिकांनी आपल्या इमारतीमध्ये असलेल्या जमिनीखालील व इमारतीवरील पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करून घ्यावी. नळ गळती, व्हॉल्व गळती असेल तर दुरुस्त करून टाकीभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा. साठवणुकीचे पाणी झाकून ठेवावे आणि ५ दिवसांपेक्षा जास्त दिवस पाणी साठवू नये. आठवड्यातील एक कोरडा दिवस पाळावा. पिण्याच्या पाण्याची भांडी आठवड्यातून एकदा रिकामी करून धुवून, पुसून आणि कोरडी करून ठेवावी. डासांच्या अळ्या पाण्यामधे होऊ देऊ नयेत. साथीचे आजार बळावल्यास महापालिकेच्या दवाखान्यांतील डॉक्टरांना दाखवावे, असेही आरोग्य विभागाने नमूद केले आहे.नागरिकांनी आपल्या इमारतीमध्ये असलेल्या जमिनीखालील व इमारतीवरील पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करून घ्यावी. नळ गळती, व्हॉल्व गळती असेल तर दुरुस्त करून टाकीभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा. साठवणुकीचे पाणी झाकून ठेवावे आणि ५ दिवसांपेक्षा जास्त दिवस पाणी साठवू नये. आठवड्यातील एक कोरडा दिवस पाळावा. पिण्याच्या पाण्याची भांडी आठवड्यातून एकदा रिकामी करून धुवून, पुसून आणि कोरडी करून ठेवावी. पुण्यात अतिवृष्टीमुळे अनेक भागांत पूर आला होता. यामुळे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित झाले असण्याची शक्यता आहे. दूषित पिण्याच्या पाण्यातून जलजन्य आजारांचा प्रसार होण्याचा धोका अधिक असतो. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागाने नागरिकांना काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे.

### साठवणुकीचे पाणी झाकून ठेवावे

नागरिकांनी आपल्या इमारतीमध्ये असलेल्या जमिनीखालील व इमारतीवरील पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करून घ्यावी. नळ गळती, व्हॉल्व गळती असेल तर दुरुस्त करून टाकीभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा. साठवणुकीचे पाणी झाकून ठेवावे आणि ५ दिवसांपेक्षा जास्त दिवस पाणी साठवू नये. आठवड्यातील एक कोरडा दिवस पाळावा. पिण्याच्या पाण्याची भांडी आठवड्यातून एकदा रिकामी करून धुवून, पुसून आणि कोरडी करून ठेवावी.

### साठवणुकीचे पाणी झाकून ठेवावे

पावसाच्या पाण्यामुळे पिण्याचे पाणी दूषित होते. हे पाणी पिल्यास अतिसार, थंडी, ताप यांसारखा त्रास होऊ शकतो. अशी लक्षणे दिसून आल्यास आशा सेविका, परिचारिका, आरोग्य सेवकांकडून त्वरित उपचार करून घ्यावेत. तसेच नजीकच्या महापालिकेच्या दवाखान्यात संपर्क साधावा. जुलाब आणि अतिसारात जलशुष्कतेसाठी ओआरएस तथा जलसंजीवनीचा (साखर, मीठ, पाणी) वापर करावा. जुलाब, अतिसार, काविळची साथ असल्यास पिण्याच्या पाण्यात क्लोरीन लिक्विड टाकूनच प्यावे, असे आरोग्य विभागाने म्हटले आहे.नागरिकांनी आपल्या इमारतीमध्ये असलेल्या जमिनीखालील व इमारतीवरील पाण्याच्या टाक्यांची साफसफाई करून घ्यावी.

# पुणेकर डेंग्यू, चिकुनगुनिया अन् झिकाच्या विळख्यात!

## डेंग्यूच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरुच; डेंग्यूचे 389 संशयित रुग्ण

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येतील वाढ सुरूच आहे. या महिन्यात डेंग्यूचे एकूण ३८९ संशयित रुग्ण आढळले आहेत. पावसाळा सुरू झाल्यामुळे डेंग्यूच्या रुग्णांचे प्रमाण वाढू लागले आहे. याचबरोबर चिकुनगुनियाचेही ८ रुग्ण आढळून आले आहेत.**



शहरात या महिन्यात डेंग्यूचे ३८९ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील ११ जणांना डेंग्यूचे निदान झाले आहे. गेल्या महिन्यात संशयित रुग्णांची संख्या १५७ होती आणि निदान झालेला केवळ १ रुग्ण होता. जानेवारी ते मे या कालावधीत दरमहा संशयित रुग्णांची संख्या १०० पेक्षा कमी होती. जानेवारी ९६, फेब्रुवारी ७५, मार्च ६४, एप्रिल ५१ आणि मे ४४ अशी रुग्णसंख्या होती. त्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर जून महिन्यापासून मोठी वाढ झालेली आहे. शहरात या वर्षभरात डेंग्यूचे ८७६ संशयित रुग्ण आढळले असून, निदान झालेले २१ रुग्ण आहेत. यंदा शहरात चिकुनगुनियाचे १८ रुग्ण आढळले आहेत. त्यात फेब्रुवारी ५, मार्च ४, जून १ आणि आता जुलैमध्ये ८ रुग्ण आढळले आहेत. शहरात हिवतापाचा यंदा एकही रुग्ण आढळून आलेला नसल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अहवालातून समोर आले आहे.पावसाळा सुरू असल्याने डासांचे प्रमाण वाढले असून, त्यांच्या माध्यमातून पसरणारे संसर्गजन्य रोगही वाढले आहेत. यामुळे महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून डासोत्पत्ती स्थाने शोधून नष्ट करण्याचे काम सुरू आहे. यंदा डासोत्पत्ती स्थाने आढळल्याप्रकरणी १ हजार १७४ घरमालकांना नोटिसा बजावून त्यांच्याकडून ४ लाख ३७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.शहरातील झिकाची रुग्णसंख्या ३७ वर पोहोचली आहे.

### झिकाची रुग्णसंख्या 37 वर

शहरातील झिकाची रुग्णसंख्या ३७ वर पोहोचली आहे. त्याखालोखाल मुंढवा ४, पाषाण ४, खराडी ३, आंबेगाव बुद्रुक, कळस, सुखसागरनगर, घोले रस्ता प्रत्येकी २, लोहगाव आणि धनकवडी प्रत्येकी १ अशी एकूण ३७ रुग्णसंख्या आहे. त्यातील १३ गर्भवती आहेत, अशी माहिती महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी दिली.

## शहरात खड्डेच खड्डे

# पिंपरी-चिंचवडमधील रस्त्यांची चाळण!

### शहरात किती खड्डे?महापालिकेचा केवळ 423 खड्डे असल्याचा दावा?

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहर परिसरात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे अंतर्गत रस्त्यांची चाळण झाली असून, खड्डेच खड्डे पडले आहेत. शहरातील विविध रस्त्यांवर तब्बल २००३ खड्डे आढळून आले होते. त्यांपैकी १५८० बुजविले असून, केवळ ४२३ खड्डे असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.**



यंदा जूनअखेर पावसाला सुरुवात झाली. गेल्या काही दिवसांपासून शहरात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शहरातील पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, नवी सांगवी, जुनी सांगवी, वाकड, ताथवडे, पुनावळे, थेरगाव, चिखली, आकुर्डी परिसरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत २००३ खड्डे आढळले होते. त्यांपैकी १६३९ खड्डे १३ जुलैपर्यंत आढळून आले होते. त्यानंतर २२ जुलैअखेर ३६४ खड्डे आढळून आले आहेत.

यांपैकी डांबर आणि कोल्ड मिक्सने १०११, खडीने ३५६, पेव्हिंग ब्लॉकने ६६, सिमेंट कॉंक्रीटने १४७ असे १५८० खड्डे पूर्णतः बुजविले आहेत.

शहरातील केवळ ४२३ खड्डे बुजविण्याचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. मात्र, शहरातील रस्त्यांवर सर्वत्र खड्डेच खड्डे दिसून येतात.

#### वाहनचालकांची कसरत

खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहिल्यामुळे वाहनचालकाला खड्ड्याचा अंदाज येत नाही. वाहन खड्ड्यात आदळून चालकाला तसेच वाहनाला दणका बसत आहे. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत. खड्ड्यांपासून बचावासाठी दुचाकीचालकांना कसरत करावी लागत आहे. परिणामी वाहतुकीला संथ गती येत आहे.

शहरातील सर्वच भागांतील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. महापालिका प्रशासन पावसाळ्यापूर्वी खड्डे बुजविण्यात अपयशी ठरले आहे. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवावेत, अशी मागणी माजी नगरसेवक अमित गावडे यांनी केली.

पावसामुळे डांबरीकरण करणे शक्य होत नाही. त्यामुळे पावसाळ्यात रस्त्यावर पडलेले खड्डे मुरूम, खडी आणि सिमेंट-कॉंक्रीटने बुजविले जातात. पावसाळा संपल्यानंतर सर्व खड्डे पुन्हा नव्याने डांबराने भरण्यात येणार असल्याचे महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले. दर वर्षी पावसाळ्यात पडणाऱ्या खड्ड्यांबाबत लोकप्रतिनिधी आणि अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवितात आणि स्वत: नामानिराळे राहतात. रस्ते तयार करताना त्यावर खड्डे पडणारच नाहीत अशा प्रकारे दर्जेदार का बांधले जात नाहीत? रस्त्याचा आराखडा तयार करणाऱ्या अभियंत्यापासून तो बनविणाऱ्या ठेकेदारांपर्यंत सर्वांवर गुन्हे दाखल केले तरच याला आळा बसेल, असे वाहनचालक नितीन गावडे म्हणाले.

---

# 'पीएमआरडीए' आराखड्यावर सहा ऑगस्टला होणार सुनावणी!

### नियोजन समितीच्या सहा सदस्यांची उच्च न्यायालयात याचिका दाखल

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) विकास आराखड्याविरोधात दाखल झालेल्या दहा याचिकांवर सहा ऑगस्टला सुनावणी होणार आहे. नियोजन समितीच्या सहा सदस्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यानंतर उद्योजक आणि नागरिकांनीदेखील याचिका दाखल केल्या आहेत. त्यामुळे विकास आराखड्याच्या मंजुरीला आणखी वाट पाहावी लागणार असल्याचे चित्र आहे. ६ ऑगस्टला पीएमआरडीच्या वतीने बाजू मांडण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**



पीएमआरडीच्या वतीने २०२१ मध्ये विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला होता. तेव्हा विश्वासात न घेता हा आराखडा प्रसिद्ध करण्यात आल्याचा आक्षेप नियोजन समितीच्या सदस्यांनी घेतला. समितीमध्ये पीएमआरडीएअंतर्गत येणाऱ्या सात ग्रामपंचायतींचे सदस्य, नगरपालिका-नगरपंचायतचा एक सदस्य, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचे २२ आणि १५ शासकीय कर्मचाऱ्यांचा समावेश होतो.

नियोजन समिती अस्तित्वात नसताना विकास आराखडा तयार करण्यात आला. त्या विरोधात एका सदस्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर २०२१ मध्ये न्यायालयाने या आरखड्याला स्थगिती दिली. त्यानंतर पीएमआरडीए प्रशासनाच्या वतीने नियोजन समितीच्या निवडणुका घेण्यात आल्या. समिती गठित करण्यात आली. समिती गठित झाल्याने याचिकाकर्त्याकडून याचिका मागे घेण्यात आली. मात्र त्यानंतर नियोजन समितीच्या सहा सदस्यांनी विकास आराखड्याला विरोध करत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

#### अशा आहेत दाखल 10 याचिका...

३ - नियोजन समिती सदस्य
३ - सामाजिक कार्यकर्ता व नागरिक
२ - शेतकरी
१ - आर्किटेक्ट
१ - जमीन व्यावसायिक (रियल इस्टेट)

---

# 'पवना बंद पाइप-लाईन योजनेचा वाया गेलेला खर्च वसूल करण्यात यावा'

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज



महापालिकेचे सहशहर अभियंता यांनी कार्यकारी अभियंता असताना महापालिकेच्या ताब्यात जागा नसताना पवना बंद पाइप लाइनची निविदा काढली. तसेच, त्या योजनेला महापालिकेचे आतापर्यंत १२५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. गेल्या पंधरा वर्षात ही योजना शेतकऱ्यांचा विरोध असल्याने पूर्ण होवू शकली नाही. त्याला सर्वस्वी जबाबदार हे सध्याचे सहशहर अभियंता रामदास तांबे आहेत.

त्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे महापालिकेचे करोडो रुपये खर्च झाले आहेत ते त्यांच्या निवृती वेतनातून व पेन्शनच्या रक्कमेतून वसूल करावे, अशी मागणी पिंपरी-चिंचवड मधील माहिती अधिकार कार्यकर्ते रमेश नानासाहेब वाघेरे यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनाप्रमाणे, तत्कालीन कार्यकारी अभियंता रामदास तांबे यांनी महापालिकेच्या ताब्यात जागा नसताना घाई-घाईत

स्वतःच्या फायद्यासाठी निविदा काढली. त्यामुळे शहरातील करदात्या नागरिकांचे सुमारे १२५ कोटी रुपये वाया गेले आहेत.




**ऑलिम्पिकसारख्या भव्य स्पर्धासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतात. त्यांतील बहुतेक सुविधा केवळ त्या स्पर्धेपुरत्या म्हणजेच तात्पुरत्या स्वरूपातील असतात. पण अशा स्पर्धांच्या निमित्ताने शाश्वत मूल्यांचे जतन, जोपासना व संक्रमण मोठ्या प्रमाणात व्हावे यासाठीही प्रयत्न केले जातात. पॅरिस ऑलिम्पिकच्या निमित्ताने जगभर पोहोचवण्यात येणाऱ्या संदेशाविषयी...**

# माध्यमातून मूल्यांची जोपासना



अधिक वेगाने, आणखी उंच आणि अधिक ताकदीने (फास्टर, हायर, स्ट्राँगर) ही तिहेरी प्रेरणा घेऊन स्पर्धांत भाग घेणारे क्रीडापटू आणि त्यांच्या जोडीला सर्वच जग महिनाभर या खेळामध्ये आकंठ रंगून जाईल. अर्थात या लेखाचा विषय ऑलिंपिकमधील खेळांची स्पर्धा, विक्रम, कोण सर्वांत जास्त जलद धावपटू आहे, कोणाला तो 'सुवर्ण बूट' मिळाला, कोणत्या संघाने सर्वांत जास्त पदके मिळवली याबद्दलचा नाही. तर ऑलिम्पिक स्पर्धेच्या निमित्ताने जगभरात ऑलिम्पिक म्हणजे खेळाच्या माध्यमातून जी मूल्ये समाजमानसात रुजवायची आहेत, त्याबद्दलचा आहे. खेळांमधून आपल्याला पदकांपलीकडे काय मिळवायचे आहे? तर या अटीतटीच्या स्पर्धेपलीकडे जात उत्तमता, परस्पर आदर व मैत्रीभाव या तीन मूल्यांचा जगभर प्रचार-प्रसार व्हावा व या क्रीडाशिक्षणातून अधिक उन्नत असा समाज निर्माण व्हावा. हा लेख त्या तीन मूल्यांबद्दल...उत्तमता या शब्दाची पहिली ओळख शाळा महाविद्यालयात झाली १९७० च्या दशकात, तीन अगदी वेगळ्या स्रोतांद्वारे! सावरकरांची कविता त्यात पहिली. मग जसे खेळाचे वेड लागले तसे सर्जी बुबका या रशियन (युक्रेनी) बांबू उडी (पोल व्हॉल्ट) मारणाऱ्या खेळाडूबद्दल वाचनात येऊ लागले. बांबू उडी हा अत्यंत अवघड खेळ. सर्जी बुबकाचा जन्म डिसेंबर १९६३मध्ये झाला. त्याला अशक्य असे बहुधा काहीच नव्हते. त्याची प्रत्येक उडी नवीन विक्रमाकडे जाणारी होती. कधी काळी असंभवनीय वाटणारी सहा मीटरची उंची (सुमारे २० फूट) त्याने पार केली. प्रत्येक उडीत इतर स्पर्धक बाद होत असताना त्याची पुढची उडी मात्र स्वत:शीच स्पर्धा करणारी असे. इंग्रजीतील 'रेझ द बार' (रेझ द बार) हा वाक्प्रचार बहुधा सर्जीमुळेच आला असावा, इतपत शंका यावी असा तो उंच उंच जात असे. जुलै १९९४ मध्ये ६.१४ मीटरच्या उडीसह त्याने १७ वा आणि अंतिम विश्वविक्रम नोंदविला! तो मोडायला २०२४ हे वर्ष उजाडावे लागले. पुरुषांसाठी सध्याचा पोल व्हॉल्ट जागतिक विक्रम एप्रिल २०२४ मध्ये अमेरिकेत जन्मलेल्या स्वीडिश व्हॉल्टर आर्मंड डुप्लांटिसने ६.२४ मीटर या नव्या उंचीवर नेऊन ठेवला. बुबकाच्या पुढे दोनच आहेत. हे वाचताना हेही लक्षात घेतले पाहिजे की गेल्या काही वर्षांतील विक्रम हे फायबरचे हलके पण ताकदवान व तरीही लवचीक पोल वापरून नोंदविण्यात आले आहेत. असो. याच काळात जगावर राज्य केले रोमानियाची नादिया कोमानेसी हिने. १९७६ च्या मंट्रियाल येथील ऑलिम्पिक स्पर्धेत तिने जणू काही बालपणातच (१४ वर्षे) प्रथम जिम्नॅस्टिक्स या अत्यंत अवघड खेळात १० पैकी १० म्हणजे 'परफेक्ट टेन' गुण मिळवले. आणि एकदा नाही तर त्याच स्पर्धेत आणखी सहा वेळा! इंग्रजीत 'परफेक्ट टेन' म्हणजे कधीही न चुकणारा. ती कधी चुकतच नसे! तिची प्रत्येक हालचाल अतिशय डौलदार, सुबक आखीवरेखीव असे. अनेक कसरती करून जमिनीवर उतरतानाचे म्हणजे लँडिंगचे दृश्यही अतिशय देखणे आणि १०० टक्के अचूक असे. हेही स्मरणात ठेवले पाहिजे की त्यावेळी आजसारखे प्रगत दर्जाचे संगणक, कॅमेरा साहित्य नव्हते! नंतरही नादिया चर्चेत येण्याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे रोमानियातील कम्युनिस्ट पक्षधार्जिणे सरकार आणि पोलिसांच्या सततच्या टेहळणीला आणि स्वातंत्र्याच्या संकोचाला कंटाळून तिने नोव्हेंबर १९८९ मध्ये गुपचूप हंगेरीची सीमारेषा ओलांडली. पुढे तिने अमेरिकेचे नागरिकत्व स्वीकारले. जिम्नॅस्ट म्हणून निमुळत्या पट्टीवर देखणी हालचाल करणारी नादिया म्हणजे उत्तमत्तेचे पर्यायी नाव.याच सुमारास म्हणजे १९८२ मध्ये अमेरिकन उद्योग जगतातील उदाहरणावर आधारित अनेक उद्योगांच्या उत्तमतेच्या सुरस कथा जगासमोर आणल्या एका पुस्तकाने.

## प्रासंगिक »

### भाकितांचा भूतकाळ

***ही गोष्ट १८५४ ची. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये एक खासदार बोलत होते.***

'विज्ञानात नुकत्याच झालेल्या प्रगतीमुळे आपण आता अशा स्थितीत आलो आहोत की, उद्या लंडनचे हवामान कसे असेल हे २४ तास अगोदरच कळू शकेल.' त्यांचे हे वाक्य ऐकताच सभागृहात मोठाच हशा पिकला. हजारो वर्षांपासून लोकांना असे वाटे की हवामान हे पूर्णत: विस्कळीत, ताळतंत्ररहित (CHAOTIC) असून त्याला कोणत्याही नियमात, सूत्रात बांधणे शक्य नाही. त्यामुळे हवामानाचे भाकीत ही कल्पनाच त्या सभागृहाला हास्यास्पद वाटली होती. तसे हवामानाचा अंदाज बांधण्याचे प्रयत्न प्राचीन काळापासून चालू होते. इ.स. पूर्व ६५० मध्ये बॅबिलोनियन लोक ढगांकडे पाहून व तारे ग्रहावरून काही अंदाज बांधत.लोकांत प्राचीन काळापासून या संदर्भात काही लोकसंकेत व समजुती रूढ होत्या. भारतातही वेदकाळापासून आकाशाचे रंग, ग्रह, नक्षत्रे इ. च्या आधारे हवामानाचे काही ठोकताळे बांधले जात. वराहमिहिराने पर्जन्याच्या भाकितासंबंधी काही संकेत दिले आहेत.

बेरोजगारीच्या मुद्द्यावरून वारंवार लक्ष्य ठरत असलेल्या सरकारने अर्थसंकल्पात उत्पादन आणि महसुलाला प्रोत्साहन देण्याऐवजी रोजगारनिर्मितीवर भर दिला आहे. मनुष्यबळात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे गरजेचे आहे...

# नोकऱ्या, लहान व्यवसायांवरचा भर स्वागतार्ह!



नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतरचा त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प होता. त्यात मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाच्या आर्थिक धोरणांची मांडणी करण्यात आली आहे. या धोरणांना या सरकारबरोबर आघाडीत असलेल्या एनडीएतील मित्रपक्षांकडूनही मंजुरी मिळणे आवश्यक आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे हे सातवे विक्रमी सादरीकरण होते. हा अर्थसंकल्प पुढील वर्षीचा नवीन अर्थसंकल्प सादर होण्यापर्यंत म्हणजे आता फक्त सहा महिन्यांपुरताच असला तरी, तो सरकारची आर्थिक दृष्टी स्पष्ट करतो. या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मिती, कौशल्य आणि प्रशिक्षण, तरुणांसाठी प्रशिक्षण, लहान व्यवसायांना प्रोत्साहन देण्यावर सरकारने भर दिलेला दिसत आहे. कोळसा आणि जिवाश्म इंधनापासून अधिक हरित आणि शाश्वत ऊर्जा स्रोतांकडे संक्रमण होत असल्याने देशाच्या ऊर्जा आव्हानांचीही त्यात दखल घेतली गेल्याचे दिसत आहे. त्यामुळे सार्वजनिक – खासगी भागीदारीसह अणुऊर्जेचा उल्लेख महत्त्वाचा आहे, तसेच साठविलेल्या पाण्यापासून ऊर्जानिर्मितीचे धोरणही महत्त्वाचे आहे.२०२४-२५ च्या या केंद्रीय अर्थसंकल्पाचा मुख्य भर रोजगारनिर्मिती आणि छोट्या व्यवसायांना मदत करण्यावर आहे. रोजगार निर्माण करणे आणि कौशल्य प्रोत्साहनाला प्राधान्य आहे. छोट्या व्यवसायांना बिनव्याजी कर्ज देऊन निर्यात बाजारांमध्ये त्यांना सहज प्रवेश मिळवता यावा यासाठी सक्षम केले जाणार आहे. भांडवली नफ्यावरही कर वाढला आहे. हे ज्यामध्ये मानवी भांडवल विकसित होणे अपेक्षित आहे, अशा श्रमकेंद्रित विकासवाढीच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असू शकते. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकारने रस्ते आणि विमानतळांसारख्या पायाभूत सुविधांवरील खर्च जाणीवपूर्वक वाढवला आहे. ही साधनसंपत्ती वेगाने विकसित केली गेली आहे आणि ती विकसित झाली आहे, हे दिसते आहे. पायाभूत सुविधांवरील सार्वजनिक खर्च हा विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक आहे. पण त्याचबरोबर रोजगारनिर्मितीचा वेग कायम राहिलेला नाही आणि ग्रामीण भागातील वेतन रखडले आहे. रोजगार निर्माण करणारे छोटे उद्योग अडचणीत आले आहेत. सकल राष्ट्रीय उत्पादनापेक्षा ग्राहकांचा खर्च कमी आहे, ही बाब चिंताजनक आहे. दीर्घकालीन, शाश्वत आणि सर्वसमावेशक वृद्धीसाठी भारताला मनुष्यबळात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणे गरजेचे आहे. ती जीडीपीच्या सहा टक्क्यांपर्यंत म्हणजे सध्याच्या गुंतवणुकीच्या दुप्पट होणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विरोधक लाडक्या बहिणीचे सावत्र भाऊ!

## केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घोषणा करण्यात आल्या

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र सरकारने लाडकी बहीण आणि लाडका भाऊ ही योजना जाहीर केली असली तरी राज्याकडे पैसे नाहीत. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या घोषणा करण्यात आल्या, असा आरोप विरोधकांकडून होत असताना आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर उत्तर दिले आहे. ते म्हणाले, विरोधकांच्या या वावड्या आहेत. विरोधकांना पोटदुखी झालेली आहे. मी कालही म्हणालो, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना विरोधकांना पचलेली नाही. त्यांना हाजमोला द्यायला पाहीजे. माझ्या लाडक्या बहिणीचे हे सावत्र भाऊ आहेत. माझ्या बहिणींना पैसे मिळता कामा नयेत, ही योजना सुरू होता कामा नये, यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू आहे. पण सरकार म्हणून आम्ही जेवढा पैसा लागेल तेवढा देऊ."**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या निती आयोगाच्या बैठकीला हजर राहण्यासाठी दिल्ली येथे आले असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले, "आम्ही कोणताही निर्णय घेतल्यानंतर मागे हटत नाहीत. आमच्याकडून 'प्रिटिंग मिस्टेक' झाली असे म्हणत नाही. चुनावी जुमला होता, असे म्हणत नाही. कारण आम्ही पूर्ण विचाराअंती निर्णय घेतला आहे."आमच्या सरकारने महिलांना एसटीच्या तिकीटात ५० टक्के सवलत दिली, ज्येष्ठांना मोफत प्रवासाची मुभा दिली, तेव्हा निवडणुका नव्हत्या. त्यामुळे माझ्या लाडक्या बहिणी आणि भावांनी एक गोष्ट ध्यान्यात घ्यावी की, त्यांच्याविरोधात कोण आहे", अशीही टीका एकनाथ शिंदे यांनी केली.दिल्लीत सध्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मुख्यमंत्री शासकीय बैठकीसाठी आले असताना दोन्ही उपमुख्यमंत्रीही दिल्लीत उपस्थित आहेत. त्यामुळे विधानसभेच्या जागावाटपावर काही चर्चा झाली आहे का? असा प्रश्न यावेळी शिंदे यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, जागावाटप योग्यवेळी होईल. महायुतीने दोन वर्षात जे काम केले आहे, त्यानुसार महायुतीला यश नक्की मिळेल. शरद पवार यांनी विविध प्रश्नांसंबंधी माझी भेट घेतली होती. यावेळी आरक्षणासंबंधी आम्ही चर्चा केली. जाती-जातीवरून महाराष्ट्रात तणाव दिसत आहे. गावबंदीसारखे प्रकरणे घडत आहेत. याआधी महाराष्ट्रात असे कधी घडले नव्हते. महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे, इथे सर्व लोक गुण्या-गोविंदाने राहतात. ओबीसी आणि मराठा समाजाच्या नेत्यांना एकत्र बसवून बैठक घेतली पाहीजे, असे त्यांनी सूचविले. मीही याला समर्थन दिले. निवडणूक येतात आणि जातात. पण जे वातावरण बिघडले आहे, ते पूर्वपदावर आणणे गरजेचे आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणाऱ्या निती आयोगाच्या बैठकीला हजर राहण्यासाठी दिल्ली येथे आले असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले, "आम्ही कोणताही निर्णय घेतल्यानंतर मागे हटत नाहीत. आमच्याकडून 'प्रिटिंग मिस्टेक' झाली असे म्हणत नाही. चुनावी जुमला होता, असे म्हणत नाही. कारण आम्ही पूर्ण विचाराअंती निर्णय घेतला आहे."आमच्या सरकारने महिलांना एसटीच्या तिकीटात ५० टक्के सवलत दिली, ज्येष्ठांना मोफत प्रवासाची मुभा दिली, तेव्हा निवडणुका नव्हत्या. त्यामुळे माझ्या लाडक्या बहिणी आणि भावांनी एक गोष्ट ध्यान्यात घ्यावी की, त्यांच्याविरोधात कोण आहे", दिल्लीत सध्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मुख्यमंत्री शासकीय बैठकीसाठी आले असताना दोन्ही उपमुख्यमंत्रीही दिल्लीत उपस्थित आहेत. त्यामुळे विधानसभेच्या जागावाटपावर काही चर्चा झाली आहे का? असा प्रश्न यावेळी शिंदे यांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, जागावाटप योग्यवेळी होईल. महायुतीने दोन वर्षात जे काम केले आहे, त्यानुसार महायुतीला यश नक्की मिळेल. शरद पवार यांनी विविध प्रश्नांसंबंधी माझी भेट घेतली होती. यावेळी आरक्षणासंबंधी आम्ही चर्चा केली. जाती-जातीवरून महाराष्ट्रात तणाव दिसत आहे. गावबंदीसारखे प्रकरणे घडत आहेत. याआधी महाराष्ट्रात असे कधी घडले नव्हते. महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे, इथे सर्व लोक गुण्या-गोविंदाने राहतात.

### लाडका भाऊ ही योजना जाहीर

मराठा समाजाच्या नेत्यांना एकत्र बसवून बैठक घेतली पाहीजे, असे त्यांनी सूचविले. मीही याला समर्थन दिले. निवडणूक येतात आणि जातात. पण जे वातावरण बिघडले आहे, ते पूर्वपदावर आणणे गरजेचे आहे.महाराष्ट्र सरकारने लाडकी बहीण आणि लाडका भाऊ ही योजना जाहीर केली असली तरी राज्याकडे पैसे नाहीत. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून या घोषणा करण्यात आल्या, असा आरोप विरोधकांकडून होत असताना आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर उत्तर दिले आहे.

# दुर्दैवाने जनतेनं राज ठाकरेंसारखी भूमिका नाही

## शरद पवारांचा टोला; अजित पवारांनाही केलं लक्ष्य!

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी दोन दिवसांपूर्वीच मुंबईतील पदाधिकारी मेळाव्यात मोठी घोषणा केली. लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना बिनशर्त पाठिंबा दिल्यानंतर विधानसभा निवडणुकीत राज ठाकरेंनी स्वबळाचा नारा दिला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात त्याचे पडसाद उमटू लागले आहेत.**





यावरून उद्धव ठाकरे गट व शरद पवार गटाकडून तोंडसुख घेतलं जात असताना आता खुद्द शरद पवार यांनीच राज ठाकरेंना टोला लगावला आहे. शरद पवार छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर असताना राज ठाकरेंबाबत माध्यम प्रतिनिधींनी प्रश्न विचारला असता त्यावर शरद पवारांनी खोचक प्रतिक्रिया दिली.शरद पवारांनी यावेळी राज्यातील अनेक राजकीय मुद्द्यांवर भाष्य केलं. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरही त्यांनी भूमिका मांडली. यावेळी त्यांना माध्यम प्रतिनिधींनी राज ठाकरेंच्या भूमिकेबाबत विचारणा केली. 'राज ठाकरेंनी मेळाव्यात बोलताना कार्यकर्त्यांना सत्तेत बसवल्याशिवाय थांबणार नाही', असं म्हटल्याचं शरद पवारांना माध्यम प्रतिनिधींनी सांगितलं. त्यावर शरद पवारांनी सूचक हास्य करत मिश्किल टिप्पणी केली."राज ठाकरे असं बोलत आहेत ही चांगली गोष्ट आहे. गेल्या वेळीही त्यांनी अशीच भूमिका घेतली होती. पण दुर्दैवाने लोकांनी राज ठाकरेंसारखी भूमिका घेतली नाही.

### अजित पवारांना केलं लक्ष्य

लोकांनी त्यांना एकच जागा दिली", असं शरद पवारांनी म्हणताच उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटली. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेकडून राजू पाटील हे एकमेव उमेदवार आमदार म्हणून निवडून आले होते. त्यावरून शरद पवारांनी राज ठाकरेंना चिमटा काढला आहे.दरम्यान, यावेळी शरद पवारांनी अजित पवारांवरही टीका केली. राष्ट्रवादी काँग्रेसमधून फुटून अजित पवार व इतर ४० आमदारांनी सत्ताधारी भाजपा व शिंदे गटासोबत युती केली होती. मात्र, त्यातील काहीजण स्वगृही परतण्यासाठी प्रयत्नशील असल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.

# ममताचा मोदी सरकारवर आरोप!

## “नीती आयोगाच्या बैठकीत माझा माईक बंद केला”

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीत आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाची बैठक पार पडत आहे. या बैठकीत विविध राज्यांचे मुख्यमंत्रीही सहभागी झाले आहेत. महत्त्वाचे म्हणजे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी वगळता गैर भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला आहे. मात्र, आता या बैठकीत आपल्याला बोलू दिलं नाही, असा आरोप ममता बॅनर्जी यांनी केला आहे. तसेच त्या बैठक अर्धवटसोडून बाहेरही पडल्या.**



ममता बॅनर्जी यांनी बाहेर पडल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मोदी सरकार भेदभाव करत असल्याचा आरोप केला. आजच्या बैठकीत मला बोलण्यासाठी केवळ पाच मिनिटे दिली होती. मात्र, आंध्राप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांना २० मिनिटे, तर आसाम, गोवा आणि छत्तीसगढ या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना प्रत्येकी १० ते १५ मिनिटे देण्यात आली. यावेळी माझा माईकही बंद करण्यात आला. अशा प्रकारे मोदी सरकार विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांशी भेदभाव करत आहेत, अशी प्रतिक्रिया ममता बॅनर्जी यांनी दिली.विरोधी पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला असताना केवळ मी या बैठकीला उपस्थित होते. त्यामुळे मोदी सरकारने यावर समाधान व्यक्त करायला हवं. मात्र, त्याऐवजी ते मला बोलण्यापासून रोखत आहेत. हा केवळ माझा नाही, संपूर्ण बंगालचा अपमान आहे. मोदी सरकारची वागणूक बघता, आता मीसुद्धा या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे बैठकीतून बाहेर पडले आहे. यापुढे मी कोणत्याही बैठकीला उपस्थित राहणार नाही, असंही ममता बॅनर्जी म्हणाल्या.दरम्यान, ममता बॅनर्जी यांच्या आरोपावर केंद्र सरकारने स्पष्टीकरण दिलं. ममता बॅनर्जी यांनी केलेले आरोप चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहेत. त्यांना या बैठकीत बोलण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला होता. त्यांची बोलण्याची वेळ संपल्याने त्यांचा माईक बंद करण्यात आला, असं केंद्र सरकारकडून सांगण्यात आलं.दरम्यान, नीती आयोगाच्या बैठकीत सहभागी होण्यापूर्वी सुद्धा ममता बॅनर्जी यांनी मोदी सरकारवर टीका केली होती. यंदाच्या अर्थसंकल्पातून भाजपाने केवळ दोन राज्यांना झुकतं माप दिलं असून विरोधकांचं सरकार असलेल्या राज्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवलं आहे, असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं होतं. तसेच नीती आयोग हटवून पुन्हा नियोजन आयोग आणा, अशी मागणीही त्यांनी केली होती.भारताला २०४७पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,” असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले. हे ध्येय साध्य करण्यासाठी राज्ये सक्रिय भूमिका निभावू शकतात, कारण त्यांचा थेट जनतेशी संपर्क असतो, असे ते म्हणाले. निती आयोगाच्या नवव्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीचे अध्यक्षपद मोदींनी भूषविले. या कौन्सिलमध्ये सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे.राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत उपस्थितांना संबोधित करताना मोदी यांनी आपला देश तरुणांचा असल्याचे सांगितले. तसेच परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी राज्यांनी धोरणे आखावीत, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.निती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, २६ मुख्यमंत्री व नायब राज्यपालांनी बैठकीला हजेरी लावली. बैठकीला मुख्यमंत्री गैरहजर राहिल्यास संबंधित राज्यांचे नुकसान होते, असे आयोगाने स्पष्ट केले. या बैठकीत भारताला २०४७पर्यंत विकसित राष्ट्र करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यासाठी केंद्र व राज्यांचा प्रशासनातील सहभाग आणि सहकार्य, तसेच, गेल्या वर्षाच्या अखेरीस डिसेंबरमध्ये झालेल्या मुख्य सचिवांच्या तिसऱ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये करण्यात आलेल्या शिफारशींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

### सरकार भेदभाव करत आहे

ममता बॅनर्जी यांनी बाहेर पडल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी मोदी सरकार भेदभाव करत असल्याचा आरोप केला. आजच्या बैठकीत मला बोलण्यासाठी केवळ पाच मिनिटे दिली होती. मात्र, आंध्राप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांना २० मिनिटे, तर आसाम, गोवा आणि छत्तीसगढ या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना प्रत्येकी १० ते १५ मिनिटे देण्यात आली. यावेळी माझा माईकही बंद करण्यात आला. अशा प्रकारे मोदी सरकार विरोधी पक्षांच्या मुख्यमंत्र्यांशी भेदभाव करत आहेत, अशी प्रतिक्रिया ममता बॅनर्जी यांनी दिली.विरोधी पक्षाच्या मुख्यमंत्र्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला असताना केवळ मी या बैठकीला उपस्थित होते.

---

# “सेक्स बेडरुमपर्यंत मर्यादित का राहू शकत नाही?

## ऑलिम्पिकच्या उद्घाटन सोहळ्यावरून कंगनाची संतप्त प्रतिक्रिया!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अवघ्या जगाचं लक्ष लागून राहिलेल्या पॅरिस ऑलिम्पिकच्या क्रीडा उत्सवाच्या पहिल्यावहिल्या तरंगत्या उद्घाटन सोहळ्याला सेन नदीच्या पात्रात सुरुवात झाली. अत्यंत भव्यदिव्य असलेल्या या उद्घाटन सोहळ्यात जवळपास पाच लाख प्रेक्षक उपस्थित होते. दरम्यान, हा उद्घाटन सोहळा आता वादग्रस्त ठरला आहे.**






येथील बीभत्स प्रकारांमुळे अनेकांनी संताप व्यक्त केला असून यावरून खासदार कंगना रणौत यांनीही त्यांच्या इन्स्टाग्राम पोस्टवरून टीका केली आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात अति लैंगिक कृत्ये दाखवण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. यासाठी लहान मुलांचाही वापर करण्यात आल्याने संताप व्यक्त करण्यात येतोय. ड्रॅग क्विन्द्वारे दि लास्ट सपरची प्रतिकृती तयार केल्याचा दावा करून यामुळे ख्रिश्चन समाजाच्या भावना दुखावल्याचाही आरोप केला जातोय. यावरून कंगना रणौत यांनी टीका केली आहे.द लास्ट सपरच्या अति-लैंगिक, निंदनीय सादरीकरणामध्ये एका लहान मुलाचा समावेश केल्याबद्दल पॅरिस ऑलिम्पिकवर टीका केली जात आहे.

ड्रॅग क्वीनच्या सादरीकरणादरम्यान एक लहान मुलाचाही समावेश असल्याचं स्पष्ट दिसत आहे. त्यांनी येशूच्या रूपात निळ्या रंगात रंगवलेला एक नग्न माणूस देखील दाखवून ख्रिश्चन समाजाचा अपमान केला आहे. डाव्या विचारसरणीच्या लोकांनी २०२४ चे ऑलिम्पिक पूर्णपणे हायजॅक केले आहे

### ऑलिम्पिकच्या कार्यक्रमावर टीका

कंगना रणौत म्हणाल्या.उद्घाटन समारंभातील आणखी एक फोटो शेअर करून त्यांनी म्हटलंय की हा कार्यक्रम समलैंगिकतेवर आधारीत होता. पोस्टमध्ये रणौत म्हणाल्या, “ऑलिम्पिकच्या उद्घाटन कार्यक्रमात सर्वकाही समलैंगिकतेशी संबंधित होते. मी समलैंगिकतेच्या विरोधात नाही पण ऑलिम्पिकचा लैंगिकतेशी काय संबंध? खेळ आणि स्पर्धांमध्ये लैंगिकता का आणली जाते? सेक्स बेडरुमपर्यंत मर्यादित का राहू शकत नाही?” असा संतप्त सवालही कंगना रणौत यांनी (KANGANA RANAUT ON OLYMPICS) उपस्थित केला.

# रितेश देशमुखने बायकोसह शेअर केला व्हिडीओ!



जिनिलीया व रितेश देशमुख हे दोघंही सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असतात. या जोडीचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. मराठीसह बॉलीवूडमध्ये रितेश-जिनिलीयाकडे एक आदर्श जोडपं म्हणून पाहिलं जातं. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर रितेश-जिनिलीयाने २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. तेव्हापासून या दोघांना महाराष्ट्राचे लाडके 'दादा-वहिनी' म्हणून ओळखलं जातं. यांनी इन्स्टाग्रामवर नुकताच शेअर केलेला एक मजेशीर व्हिडीओ सध्या चर्चेत आला आहे.रितेश-जिनिलीया रोमँटिक व्हिडीओ, पोस्ट याचबरोबर अनेकदा मजेशीर व्हिडीओ शेअर करून आपल्या चाहत्यांना खळखळून हसवत असतात. लग्नानंतर नवरा-बायकोमध्ये छोट्या-छोट्या गोष्टींमुळे वाद होत असतात. पण, 'घरोघरी मातीच्या चुली' या म्हणीप्रमाणे नेहमीच नवऱ्याला बायकोचं ऐकावं लागतं. रितेशचं सुद्धा असंच काहीसं होतं. यावरूनच या दोघांनी ट्रेंडिंग ऑडिओ वापरून एक व्हिडीओ शेअर केला आहे.

# बिग बींसह हॉट सीटवर बसण्याची संधी!

कौन बनेगा करोडपती' हा टीव्हीवरील सर्वात लोकप्रिय रिॲलिटी शोपैकी एक आहे. १५ यशस्वी सीझननंतर लवकरच या शोचे १६ वे पर्व प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यावेळीही हा शो महानायक अमिताभ बच्चन होस्ट करणार आहेत. या शोचा नवीन प्रोमो शेअर करण्यात आला आहे, त्यामुळे चाहत्यांची उत्सुकता वाढली आहे. अनेकांना या शोमध्ये सहभागी व्हायचे आहे. तुम्हालाही या शोमध्ये सहभागी व्हायचं असेल तर त्याची नोंदणी प्रक्रिया कशी असते ते जाणून घ्या.'कौन बनेगा करोडपती सीझन १६' चे प्रिमियर पुढच्या महिन्यात १२ ऑगस्ट रोजी होईल. या सीझनची टॅगलाईन 'जिंदगी है, हर मोड़ पर सवाल पूछेगी, जवाब तो देना होगा,' अशी आहे. 'कौन बनेगा करोडपती' १५ पर्वांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे व स्पर्धकांना करोडपती करत आहे. या शोमध्ये बिग बींसमोर हॉट सीटवर बसायची संधी मिळवण्यासाठी काय करावं लागेल, याबाबत अनेकांना जाणून घ्यायचं असतं. चला तर नोंदणीची प्रक्रिया जाणून घेऊ.यासाठी तुम्हाला तुमच्या फोनमध्ये सोनी लिव्ह ॲप डाउनलोड करावे लागेल. क्विझची उत्तरं दिल्यानंतर जी काही प्रक्रिया असेल ती पूर्ण करावी लागेल.

यानंतर तुमच्या स्क्रीनवर असं लिहिलेलं दिसेल.

# तिलोत्तमाला धक्कादायक अनुभव



' ल स्ट स्टोरीज २'व 'त्रिभुवन मिश्रा: सीए टॉपर' अशा वेब सीरिजसह अनेक चित्रपटांमध्ये दमदार भूमिका साकारणारी बॉलीवूड अभिनेत्री म्हणजे तिलोत्तमा शोम होय. आपल्या अभिनयाबरोबरच ती स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. आता तिने तिच्याबरोबर घडलेला एक वाईट प्रसंग सांगितला आहे. तिलोत्तमाला राजधानी दिल्लीत हा भयंकर अनुभव आला होता."मी दिल्लीत एके ठिकाणी बसची वाट पाहत थांबले होते. थंडीचे दिवस होते आणि अंधार पडला होता. त्याचवेळी एक कार माझ्या जवळ येऊन थांबली, त्या कारमध्ये सहा जण होते. त्यांना पाहून मला अस्वस्थ वाटलं आणि स्वतःचे संरक्षण करण्यासाठी मी तिथून थोडी दूर गेले. नंतर त्यांनी माझ्याकडे पाहून विचित्र हावभाव करायला सुरुवात केली, तसेच कोणीतरी माझ्यावर एक छोटा दगड फेकला. त्याचवेळी मला लक्षात आलं की मी आता इथून निघायला हवं. मी तिथून पळण्याचा विचार केला, पण ते कारमध्ये होते, त्यामुळे मला सहज पकडू शकले असते. मग मी रस्त्याच्या मधोमध उभं राहून मदत मागायचं ठरवलं"त्यानंतर खूप गाड्या त्या रस्त्यावरून गेल्या, मग मला मेडिकल साइन असलेली एक कार दिसली. मला वाटलं की डॉक्टरची गाडी असल्याने मी सुरक्षित राहीन. मी त्या गाडीत पुढच्या सीटवर बसले. पण काही वेळाने गाडीच्या ड्रायव्हरने त्याच्या पँटची चैन उघडली आणि माझा हात पकडला. त्याने जबरदस्ती माझा हात त्याच्याकडे ओढण्याचा प्रयत्न केला.

# साखरपुड्यानंतर मानसीची पहिली पोस्ट

मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री मानसी नाईक (MANASI NAIK) हिच्या पूर्वाश्रमीच्या पतीने साखरपुडा उरकला आहे. बॉक्सर प्रदीप खरेरा (PRADEEP KHARERA ENGAGEMENT) याने विशाखा जाटनी हिच्याशी साखरपुडा केला आहे. विशाखाने एक रील इन्स्टाग्रामवर शेअर करत साखरपुड्याची माहिती दिली. त्यांच्या साखरपुड्याची बातमी समोर आल्यानंतर मानसी नाईकने केलेल्या पहिल्या पोस्टने लक्ष वेधले आहे. मानसीने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आहे. तिची स्टोरी पाहिल्यानंतर लवकरच ती चाहत्यांना काही आनंदाची बातमी देणार का, अशा चर्चा होत आहेत.मानसी नाईकचा पूर्वाश्रमीचा पती बॉक्सर व सोशल मीडिया एन्फ्लुएन्सर प्रदीप खरेरा मॉडेलिंग क्षेत्रातही काम करतोय. त्याने सोशल मीडिया एन्फ्लुएन्सर विशाखा जाटनी हिच्याशी साखरपुडा केला आहे. विशाखाने इन्स्टाग्रामवरील रीलमध्ये या खास सोहळ्यातील काही क्षण शेअर केले आहेत. याच दरम्यान मानसी नाईकने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली आहे, ज्यामध्ये तिने एक व्हिडीओ शेअर केला आहे. मानसी नाईकने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यात तिच्या हातातील हिरवा चुडा पाहायला मिळत आहे. हातातील हिरवा चुडा फ्लॉंट करताना मानसीने उदित नारायण व अलका याज्ञिक यांचं 'चुडी बजी है कहीं दूर छन छन...' हे गाणं वापरलं आहे. मानसीची ही स्टोरी चांगलीच चर्चेत आहे. मानसी नाईकचा एप्रिल महिन्यात वाढदिवस झाला. तिने पॅरिसमध्ये तिचा वाढदिवस साजरा केला होता. त्यावेळी मानसीने राहुल खिसमतराव याच्याबरोबरचा एक फोटो पोस्ट केला होता. तेव्हापासून मानसी व राहुल यांच्या डेटिंगच्या चर्चा रंगल्या आहेत. पण मानसी किंवा राहुल यांनी याबाबत अद्याप प्रतिक्रिया दिलेली नाही.मानसी नाईक व प्रदीप खरेरा यांनी जानेवारी २०२१ मध्ये लग्न केलं होतं. सुरुवातीला दोघांच्याही वैवाहिक आयुष्यात सर्वकाही सुरळीत सुरू होतं, पण नंतर मात्र या दोघांमध्ये सगळं आलबेल नसल्याच्या बातम्या येऊ लागल्या. नेहमी एकमेकांबरोबर फिरायला जाणारे, फोटो व व्हिडीओ पोस्ट करणाऱ्या मानसी व प्रदीप यांनी सोशल मीडियावरून एकमेकांसोबतच्या पोस्ट डिलीट केल्या. अवघ्या दीड वर्षातच त्यांच्या घटस्फोटाची बातमी आली. मानसीने स्वतःच घटस्फोटाची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती २०२३ मध्ये दिली होती. घटस्फोटानंतर प्रदीप विशाखाशी साखरपुडा करून पुन्हा एकदा नव्याने आयुष्याची सुरुवात करतोय.मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री मानसी नाईक हिच्या पूर्वाश्रमीच्या पतीने साखरपुडा उरकला आहे.

# दीपिकासह केले इंटिमेट सीन



'गली बॉय' चित्रपटात रणवीर सिंह (RANVEER SINGH) व आलिया भट्ट (ALIA BHATT) यांच्याबरोबर महत्त्वाची भूमिका साकारून सिद्धांत चतुर्वेदीने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर तो 'गेहराइयां' चित्रपटात झळकला. यात त्याने दीपिका पादुकोणसोबत (DEEPIKA PADUKONE) इंटिमेट सीन केले होते, ज्याची खूप चर्चा झाली होती. इंटिमेट सीनमुळे आपण हा चित्रपट सोडण्याचा तयारीत होतो, अशी आठवण सिद्धांतने सांगितली आहे. दीपिकासोबत इंटिमेट सीन शूट करताना घाबरलो होतो, असं सिद्धांतने सांगितलं. सिद्धांतची अवस्था इतकी वाईट झाली होती की त्याचे वडील व निर्माता करण जोहर या दोघांनाही हस्तक्षेप करावा लागला होता. फिल्मफेअरला दिलेल्या मुलाखतीत सिद्धांत म्हणाला, "मला आठवतंय माझे वडील माझ्याशी बोलले होते. ते म्हणालेले 'ऐक, भारतातील ९९ टक्के लोक ही संधी मिळवण्यासाठी काहीही करतील. ते क्षणभरही विचार करणार नाहीत. त्यामुळे तू काय विचार करतोय. जरा प्रोफेशनल हो, कारण हे तुझं काम आहे."इतकंच नाही तर सिद्धांतच्या वडिलांनी त्याला किती मोठी संधी मिळाली आहे याची आठवणी करून दिली होती. "सिद्धांत, हे धर्मा प्रॉडक्शन आहे, दीपिका पादुकोण, शकुन बत्रा आहेत. त्यामुळे तुला हे करावंच लागेल," असं त्याचे वडील म्हणाले होते. यानंतर करण जोहरने यात हस्तक्षेप केला आणि सिद्धांतला समजावलं. "करणने मला कॉल केला आणि म्हणाला, 'काय प्रॉब्लेम आहे?' आणि मी त्याला सर्व काही सांगितलं. मग तो म्हणाला, 'तू एक अभिनेता आहेस आणि तसाच वाग, कारण हे तुझं काम आहे," अशी आठवण सिद्धांतने सांगितली.त्याच मुलाखतीत सिद्धांतने चित्रपटाच्या रिलीजनंतर वडिलांची प्रतिक्रिया काय होती ते सांगितलं. "मी माझ्या आई-वडिलांबरोबर चित्रपट पाहायला गेलो पण मी त्यांच्या शेजारी बसलो नाही.

# जो रुटने केला मोठा पराक्रम!

## ही कामगिरी करणारा ठरला जगातील सातवा फलंदाज

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**वेस्ट इंडिजविरुद्ध सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात इंग्लंडचा स्फोटक फलंदाज जो रूटने मोठा पराक्रम केला. त्याने शनिवारी एजबॅस्टन स्टेडियमवर वेस्ट इंडिजचा माजी फलंदाज ब्रायन लाराचा विक्रम मोडला. कसोटी इतिहासात सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत रूट सातव्या स्थानावर पोहोचला आहे. वृत्त लिहिपर्यंत त्याच्या खात्यात २६१ कसोटी डावात १२०२७* धावा आहेत. लाराने आपल्या कारकिर्दीत २३२ डावात ११९५३ धावा केल्या. तो आठव्या स्थानावर घसरला आहे. रूटने दुसऱ्या कसोटीत वेस्ट इंडिजचा माजी क्रिकेटपटू शिवनारायण चंद्रपॉल (११८६७) याला मागे टाकले होते.**



जो रूटने डिसेंबर २०१२ मध्ये कसोटी पदार्पण केले होते. त्याने आतापर्यंत १४३ कसोटींमध्ये ३२ शतके आणि ६३ अर्धशतके केली आहेत. तिसऱ्या कसोटीत त्याने अर्धशतक झळकावले तो ८७ धावा काढून बाद झाला. गेल्या सामन्यात त्याने शतक झळकावले होते. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. त्याने २०० कसोटी सामन्यांमध्ये १५९२१ धावा केल्या. सचिनने ५१ शतके आणि ६८ अर्धशतके झळकावली, जी सर्वाधिक आहेत.या यादीत दुसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉंटिंग आहे, ज्याने १६८ कसोटीत १३३७८ धावा केल्या आहेत. त्याने ४१ शतके आणि ६२ अर्धशतके केली. दक्षिण आफ्रिकेचा माजी अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिसने १६६ सामन्यांमध्ये १३२८९ धावा जोडल्या. त्याने ४५ शतके आणि ५८ अर्धशतके केली. भारताचा माजी फलंदाज राहुल द्रविड चौथ्या स्थानावर आहे. द्रविडने १६४ कसोटीत १३२८८ धावा केल्या. इंग्लंडचा माजी खेळाडू ॲलिस्टर कुक (१६१ कसोटीत १२,४७२ धावा) पाचव्या स्थानावर आहे.इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडिज तिसऱ्या कसोटीबद्दल बोलायचे तर, क्रेग ब्रॅथवेट ब्रिगेडने पहिल्या डावात २८२ धावा केल्या. यजमान इंग्लंडची पहिल्या डावात सुरुवात चांगली झाली नाही.

### ब्रायन लाराला मागे टाकले

जो रूटने डिसेंबर २०१२ मध्ये कसोटी पदार्पण केले होते. त्याने आतापर्यंत १४३ कसोटींमध्ये ३२ शतके आणि ६३ अर्धशतके केली आहेत. तिसऱ्या कसोटीत त्याने अर्धशतक झळकावले तो ८७ धावा काढून बाद झाला. गेल्या सामन्यात त्याने शतक झळकावले होते. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. त्याने २०० कसोटी सामन्यांमध्ये १५९२१ धावा केल्या. सचिनने ५१ शतके आणि ६८ अर्धशतके झळकावली, जी सर्वाधिक आहेत.या यादीत दुसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉंटिंग आहे, ज्याने १६८ कसोटीत १३३७८ धावा केल्या आहेत. त्याने ४१ शतके आणि ६२ अर्धशतके केली. दक्षिण आफ्रिकेचा माजी अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिसने १६६ सामन्यांमध्ये १३२८९ धावा जोडल्या.

सलामीवीर बेन डकेटला केवळ तीन धावा करता आल्या. जॅक क्रॉलीने १८ आणि ऑली पोपने १० धावा केल्या. मार्क वुडचे खाते उघडले नाही. हॅरी ब्रूक (२) स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतला. १२व्या षटकापर्यंत ५४ धावा जोडल्यानंतर इंग्लंडने पाच विकेट गमावल्या. जो रूटने डिसेंबर २०१२ मध्ये कसोटी पदार्पण केले होते. त्याने आतापर्यंत १४३ कसोटींमध्ये ३२ शतके आणि ६३ अर्धशतके केली आहेत. तिसऱ्या कसोटीत त्याने अर्धशतक झळकावले तो ८७ धावा काढून बाद झाला. गेल्या सामन्यात त्याने शतक झळकावले होते. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताचा महान फलंदाज सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे. त्याने २०० कसोटी सामन्यांमध्ये १५९२१ धावा केल्या. सचिनने ५१ शतके आणि ६८ अर्धशतके झळकावली, जी सर्वाधिक आहेत.

# यशस्वीने केवळ ११ महिन्यांत करुन दाखवलं

## पहिल्या सामन्यात श्रीलंकेचा 43 धावांनी पराभव केला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**तीन सामन्यांच्या टी-२०मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा ४३ धावांनी पराभव केला आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ गडी गमावून २१३ धावा केल्या. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ १९.२ षटकांत १७० धावांवर गारद झाला. या सामन्यात सलामीवीर यशस्वी जैस्वालने शानदार फलंदाजी केली. या सामन्यात यशस्वी जैस्वाल अर्धशतक पूर्ण पूर्ण करेल असे वाटत होते, पण त्याचे अर्धशतक हुकले.**



स्टेडियमवर त्याने २१ चेंडूत ४० धावांची खेळी साकारली. या खेळीत यशस्वीने पाच चौकार आणि दोन षटकार मारले. यशस्वीचे अर्धशतक हुकले असले, तरी विशेष यादीत त्याने रोहित शर्माच्या विक्रमाशी बरोबरी केली. जे काम रोहितने १७ वर्षात केले होते, ते यशस्वीने अवघ्या ११ महिन्यांत केले.खरे तर, टी-२० पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक वेळा ४० किंवा त्याहून अधिक धावा करणारा यशस्वी भारताचा संयुक्त पहिला खेळाडू ठरला आहे. यशस्वी आणि रोहितने प्रत्येकी चार वेळा ही कामगिरी केली आहे. यशस्वीने गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. तर, रोहित शर्माने सप्टेंबर २००७ ते जून २०२४ या कालावधीत क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमध्ये खेळला आहे. "हिटमॅन' या नावाने प्रसिद्ध असलेल्या रोहितने टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.श्रीलंकेविरुद्ध नाणेफेक जिंकून फलंदाजीला आलेल्या भारताच्या यशस्वीने शुबमन गिल (१६ चेंडूत ३४ धावा, सहा चौकार, एक षटकार) याच्या साथीने भारतीय संघाला दमदार सुरुवात करून दिली.

### सूर्याने 58 धावा केल्या

दोघांनी पॉवरप्लेमध्ये ७४ धावा जोडल्या. हा भारताचा श्रीलंकेविरुद्धचा टी-२० मधील पॉवरप्लेची सर्वोच्च धावसंख्या आहे. सहाव्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर गिल दिलशान मदुशंकाचा बळी ठरला. गिल गेल्यानंतर यशस्वीही फार काळ टिकला नाही. सातव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर त्याला वानिंदू हसरंगाने यष्टिचित केले. यशस्वी आणि गिलच्या शानदार फलंदाजीनंतर कर्णधार सूर्यकुमार यादव आणि ऋषभ पंत यांनी दमदार फटकेबाजी केली.सूर्याने २६ चेंडूंत ८ चौकार आणि २ षटकारांसह ५८ धावा केल्या. पंतने ३३ चेंडूंत ६ चौकार आणि एका षटकारासह ४९ धावा केल्या. ज्यामुळे भारतीय संघाला ७ गडी गमावून २१३ धावांचा डोंगर उभारता आला. प्रत्युत्तरात एकवेळ श्रीलंकेची धावसंख्या एका विकेटवर १४० धावा होती. मात्र, यानंतर श्रीलंकेच्या संघाने ३० धावांत पुढील नऊ विकेट गमावल्या. श्रीलंकेकडून पथुम निसांकाने सर्वाधिक ७९ धावा केल्या. त्याने २० व्या षटकात लागोपाठ दोन चेंडूत दोन बळी घेतले. अशा प्रकारे टीम इंडियाने मालिकेत १-० ने आघाडी घेतली.